प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

जून 8, 2018

**दि सिकंदराबाद को-ऑपरेटिव अर्बन बँक लि., हैद्राबाद, तेलंगणा ह्यांना आरबीआयकडून दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(2) व (4) सह वाचित कलम 47अ(1)(अ) व (क) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन भारतीय रिझर्व बँकेने, दि सिकंदराबाद को-ऑपरेटिव अर्बन बँक लि., हैद्राबाद, तेलंगणा ह्यांना रु.2,50,000/- (रुपये दोन लाख पन्नास हजार) दंड लावला आहे. हा दंड ऑटोमेटेड टेलर मशीन्स (एटीएम), सुधारित सुपरवायजरी ॲक्शन फ्रेमवर्क (एसएएफ) खाली वरील बँकेवर घातलेले निर्बंध, एक्सपोझर नॉर्म्स, ह्याबाबत आरबीआयने दिलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन व भारतीय रिझर्व बँकेला खोटी माहिती देणे आणि तपासणी दरम्यान संबंधित रेकॉर्ड्स उपलब्ध न केल्याबद्दल लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर वरील बँकेने तिचे लेखी उत्तर सादर केले होते. ह्या प्रकरणातील सत्य व बँकेने दिलेले उत्तर विचारात घेऊन, रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की, उल्लंघने झाल्याचे सिध्द होत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2017-2018/3224**